नि.क्र.१६५

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०९ याची जबानी –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : भिवा मुकुंद पिळणकर
वय सुमारे : ६१ वर्षे, धंदा – सेवानिवृत्त ए.एस.आय.
निवासस्थान : राहा. ओसरगाव,ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

---

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्रीम. एस. व्ही. गोबाडे यांचे मार्फत**

**०१.** सन २०१२ मध्ये मी सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे येथे पोलीस हेडकॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होतो. माझेकडे दिनांक ३१/०७/२०१२ रोजी गु.र.नं. २७/२०१२ चे तपासकाम माझेकडे देण्यात आले. त्या प्रकरणात न्यायालयाकडून सी.आर.पी.सी. १५६(३) प्रमाणे आदेश होवून एफ.आय.आर. नोंदविण्यात आली होती. माझेकडे एफ.आय.आर. ची प्रत देण्यात आली त्यानंतर मी फिर्यादीचा जबाब नोंदविला, साक्षीदारांचे टिपण घेतले. यतीभुषण कृष्णाजी वराडकर यांचा जबाब मी नोंदविला होता. आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर झाला होता, त्यांना नॉमिनल अटक केली होती. मी चार आरोपींना अटक केले होते व त्याचा पंनचाना केला होता. आता मला दिनांक २५/०७/२०१३ रोजीचा राजन नारायण गायतोंडे बाबतचा अटक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, आरोपींची व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१६६** देण्यात आले. आता मला दिनांक २५/०७/२०१३ रोजीचा गुरुनाथ नारायण गायतोंडे बाबतचा अटक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, आरोपींची व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१६७** देण्यात आले. आता मला दिनांक २५/०७/२०१३ रोजीचा संतोष दत्ताराम कदम बाबतचा अटक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, आरोपींची व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१६८** देण्यात आले. आता मला दिनांक ०२/०७/२०१३ रोजीचा अविनाश गुरुनाथ गायतोंडे बाबतचा अटक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर

माझी, आरोपींची व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१६९** देण्यात आले.

०२. तपासकामी खरेदीखताच्या दुयम प्रतीची मागणी मी दुयम निबंधक, सिंधुदुर्ग यांचेकडे पत्राव्दारे केली होती. आता मला दिनांक १९/०७/२०१२ रोजीचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.१७०** देण्यात आले. सदरचे दोन खरेदीखते ही सर्वे नं.२७, हि.नं.६ व सर्वे २२१ हि.नं.३५ बाबतचे होते. मी दिनांक ०९/०८/२०१२ रोजीच्या पत्रान्वये ते खेरदीखत नोंदणी करणा–या दुयम निबंधकांच्या नावाची माहिती मागितली होती. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.१७१** देण्यात आले. त्यानंतर मी आरोपींच्या हस्ताक्षरांचे व सहयांचे नमूणे घेतले व त्या बाबतचा पंचनामा केला. आता मला दिनांक २६/०८/२०१२ रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावेळी पंच म्हणून प्रमोद शिवराम कदम व भगवान नागेश कदम हे होते. त्याचप्रमाणे इतर तीन आरोपींच्या सहयांचे व हस्ताक्षरांचे नमुने घेतले बाबतचे पंचनामे केले होते. आता मला नि.११७ ते १२० वरील सदरचे चारही पंचनामे दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यावर माझी व वरील पंच प्रमोद कदम व भगवान कदम यांच्या सहया आहेत.

०३. मी फिर्यादी झिलू गावडे यांना दिनांक ०९/०१/२०१३ रोजीच्या पत्रान्वये काही कागदपत्रांची मागणी केली होती. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१७२** देण्यात येते. त्यानंतर फिर्यादीने तपासादरम्यान जमीनीचे मुळ मालक सुरेश जनार्दन गायतोंडे जे मयत होते त्यांचे जेष्ठ नागरीक ओळखपत्र माझेकडे दिले ते मी तपासात सामील केले. त्यानंतर मी आरोपींच्या सहयांचे घेतलेले नमूने, त्यांचे नैसर्गिक हस्ताक्षर व वादग्रस्त दस्ताची प्रमाणीत प्रत परिक्षणाकरीता हस्ताक्षरतज्ञ, पुणे यांचेकडे पाठविले. तपासाअंती आरोपी यांनी खोटा दस्ताऐवज तयार केल्याचे निष्पन्न झाल्याने

मी त्यांच्या विरुध्द दोषारोपपत्र पाठविले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पूर्ण.**

**प्रकरण उलटतपासाकरीता पहिल्या सत्राची वेळ संपल्याने तहकुब**

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.01.17 12:18:30 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–१६/०१/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.एस. एस. सावंत यांचे मार्फत</u> –**

**०४.** फिर्यादी झिलू गावडे यांनी वादातील जमीनींच्या ७/१२ पत्रकी त्यांच्या नावाची कुळ म्हणून नोंद नसल्याचे व त्यामुळे त्यांच्या नावचे ७/१२ उतारे देवू शकत नसल्याचे मला सांगीतले होते हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी झिलू गावडे कडे दिनांक ०९/०१/२०१३ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या नावाची कुळ म्हणून नोंद असलेले ७/१२ उतारे मागितले होते त्यास त्यांनी दिनांक २८/०१/२०१३ रोजीच्या पत्राने उत्तर दिले. आता मला नि.१०२ वरील सदरचे पत्र दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये फिर्यादी झिलू याने त्या नमूद मिळकतींच्या ७/१२ वर त्याच्या नावची नोंद झाली नसल्याचे कळविले होते. मला आय.पी.एस. कलम ४१५ माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या कलमानुसार एखादया व्यक्तीस एखादी गोष्ट करा अथवा करु नका असे सांगून तसे करायला व न करायला लावले तर फसवणूक होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या अनुषंगाने कोणतीही फसवणूक घडलेली नाही.

प्रश्न – या प्रकरणात आरोपीकडून फिर्यादीची कोणतीही फसवणूक झालेली नाही ?

उत्तर – फिर्यादीची झालेली नाही, परंतू या प्रकरणात गुन्हा घडलेला आहे.

**०५.** आरोपींचे सहयांचे व हस्ताक्षराचे नमूने घेताना त्या सहया व हस्ताक्षर

कोणत्या पेनने, कोणत्या शाईने केले, संबंधीत कागद कशाप्रकारे धरला होता व सहया करताना आरोपीची स्थिती कशी होती याबाबतची मी माहिती घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, हस्ताक्षराचे नमूने घेताना काय काळजी घ्यायची याबाबत पोलीस विभागाकडून प्रशिक्षण दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त दस्तावरील सहया आरोपींच्याच आहेत अशा आषयाचा हस्ताक्षरतज्ञांचा अहवाल मी दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी मुळ वादग्रस्त दस्त हस्ताक्षरतज्ञांकडे पाठविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी जे हस्ताक्षर व सहया आरोपींच्या नैसर्गिक हस्ताक्षर व सहया असल्याचे म्हणतो त्याच्याशी आरोपींचा कोणताही संबंध नाही.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, वादातील जमिनीच्या मालकाचा मुलगा राजेश गायतोंडे याने पोलीसांकडे अथवा न्यायालयात फसवणूकीबाबत कोणतीही तक्रार दाखल केलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, राजेशने त्याचे तपास टिपण नोंदविताना त्याची कोणतीही तक्रार नसल्याचे मला सांगीतले होते. हे म्हणणे खरे आहे की, वादातील खरेदीखतात नमूद रक्कम मी आरोपींकडून वसुल केलेली नाही. दोषारोपपत्र दाखल करताना याप्रकरणातील जमीनीच्या ७/१२ पत्रकी गुरुनाथ गायतोंडे यांचे नाव होते. चार्जशिट दाखल करताना सर्वे नं. २२१/३५ ही वादातील जमीन ख्रिश्चन संस्था म्हणजे B.V.D.E.S.J. Social Service Society यांचे नावे होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या संस्थेच्या संचालकांचे तपास टिपण मी नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्या संचालकांना आरोपी केलेले नाही.

**०७.** मी मधुकर भिकाजी सावंत याचा जबाब नोंदविला होता. जबाब देताना त्याने वादातील खरेदीखत लिहून घेणार व देणार हजर होते असे मला सांगीतले होते. साक्षीदार पुन्हा सांगतात की मला तसे सांगीतले नव्हते. सुरेश गायतोंडे मयत असताना राजन गायतोंडे यांनी खरेदीखतावर सुरेश गायतोंडे यांच्या जागी सही केली आहे ही बाब मधुकरने मला जबाब देताना सांगीतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी याप्रकरणी

दाखल केलेले सुरेश जनार्दन गायतोंडे याचे ओळखपत्र खरे असल्याबाबत संबंधीत कार्यालयाकडे शहानिशा केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तशी शहानिशा करणे गरजेचे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या दबावाखाली येवून चुकीचे तपास काम करुन आरोपी विरुध्द चुकीचे दोषारोपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे पंचनामे केले, चुकीची टिपणे नोंदविली व चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले.

**उलटतपास पूर्ण.**

<u>**फेरतपास**</u> — नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.01.17 12:18:43 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–१६/०१/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.